॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

Fax : (02462) 215572 website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/२०४ दिनांक ०७/१०/२०२४

परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,

रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,

प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: बालविवाह निर्मुलनासाठी सक्षम युवा शक्ती मोहिमे अंतर्गत "सक्षम दिवस" साजरा करणे बाबत.**

संदर्भ: सेंटर फॉर सोशल अँन्ड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन, सांताक्रुझ (पु.), मुंबई यांचे दि. ०७/१०/२०२४ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये बाल विवाहाचे प्रमाण जास्त असणा–या महाराष्ट्रातील १२ जिल्हयात बाल विवाह समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग, युनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँन्ड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह निर्मुलन प्रकल्प सोबतच्या पत्रातील निर्देशाप्रमाणे राबविण्यात येत आहे ज्याला सक्षम असे संबोधिले आहे.

तरी त्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठांतर्गत नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चार जिल्हयातील रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या जिल्हयात बाल विवाह समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग, युनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँन्ड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असलेल्या बालविवाह निर्मुलनासाठी सक्षम युवा शक्ती मोहिमे अंतर्गत आपल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी एक तासाचे प्रशिक्षण आयोजित करून निवडक विद्यार्थ्यांकडून निवड करण्यात आलेल्या गावात **"सक्षम दिवस"** सोबतच्या पत्रातील निर्देशाप्रमाणे साजरा करण्यात यावा ही, विनंती.

(**अधिक माहितीसाठी:** श्रीमती मोनाली धुर्वे, (प्रकल्प समन्वयक, बालविवाह निर्मुलन प्रकल्प) मोबाईल नंबर ९३२६४१०१९७ वर संपर्क करण्यात यावा)

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**

**संचालक**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

४) सेंटर फॉर सोशल अँन्ड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन, सांताक्रुझ (पु.), मुंबई

५) सदस्य सचिव, बालविवाह निर्मुलन जिल्हा कृती दल तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नांदेड.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे

SBC[3]

दिनांक: २४/०९/२०२४
07/10

प्रति,

मा.डॉ.मल्लिकार्जुन करजगी सो.
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

विषय: बालविवाह निर्मुलनासाठी सक्षम युवा शक्ती मोहीम अंतर्गत 'सक्षम दिवस' साजरा करण्याबाबत...

माननीय महोदय,

बालविवाहाचे प्रमाण जास्त असणाऱ्या महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यात बालविवाह समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग, युनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन (SBC[3]) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह निर्मुलन प्रकल्प राबविण्यात येत आहे ज्याला सक्षम असे संबोधिले आहे.

सक्षम कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा कृतीदलाची स्थापना करण्यात आली असून माननीय जिल्हाधिकारी सदर कृतीदलाचे अध्यक्ष आहेत. तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी हे नोडल अधिकारी प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेत असतात. सक्षम प्रकल्प अंतर्गत जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला असून अंमलबजावणीसाठी चॅम्पियन्स प्रशिक्षण घेण्यात आले आहे. शाळांमार्फत जनजागृती व्हावी यासाठी पालक व विद्यार्थी जागरूकता कार्यक्रम राबविण्यात येत आहे. माननीय जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या नेतृत्वात नांदेड, हिंगोली,परभणी,बीड, छत्रपती संभाजीनगर,जालना, धुळे, नाशिक, जळगाव,लातूर सोलापूर आणि धाराशिव या जिल्ह्यात सदर प्रकल्प सुरु आहे.

बालविवाह निर्मूलनात युवकांची भूमिका खूप महत्वाची आहे. सक्षम कार्यक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तरूणांना या मोहिमेत समाविष्ट करणे गरजेचे आहे. बालविवाह निर्मूलनात युवकांनी पुढाकार घेतल्यास बालविवाह समूळ नष्ट करण्यासाठी मोठी चळवळ उभी राहील. यासाठी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 'सक्षम युवा शक्ती' ही मोहीम सुरू करण्यात आली. मागील गेल्या २ वर्षापासून समाजकार्यात सामील असलेल्या युवकांना, 'सक्षम युवा शक्ती' या मोहिमेत जोडले असून या युवकांनी आपल्या जिल्ह्यातील गावांमध्ये जाऊन विविध जनजागृती कार्यक्रमाद्वारे समुदायाला जागरूक केले आहे.

त्याअनुषंगाने २०२४ या वर्षात सक्षम युवा शक्ती अंतर्गत ५० गावात सक्षम दिवस कार्यक्रम राबविण्यात येणार असून यासाठी एन.एस.एस.,नेहरू युवा केंद्र, समाजकार्य महाविद्यालय यांच्या निवडक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. सदर विद्यार्थ्यांचे गट प्रशिक्षण झाल्यावर निवड केलेल्या गावात जाऊन 'सक्षम युवा शक्ती' मोहिमे अंतर्गत किशोरवयीन मुली आणि मुले, गावातील नेतेमंडळी, विवाह सेवा पुरवठादार, गावातील शासकीय अधिकारी/कर्मचारी, आशा ताई,अंगणवाडी सेविका, ग्राम बाल संरक्षण समिती, शाळा व शाळा व्यवस्थापन समिती, गावातील महिला पुरुष यांच्यापर्यंत पोहचून, त्यांच्यात बालविवाह बाबत जाणीवजागृती करतील. हे युवक गट बालविवाह, विवाहाचे कायदेशीर वय आणि बालविवाहामुळे मुलींच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम याविषयी जागरूकता निर्माण करतील आणि चाईल्ड हेल्पलाईन १०९८ बाबत जनजागृती करतील.

Shri. Shaikh
prepare a circular
07/10/24

CHANGE.


## CENTRE FOR SOCIAL AND BEHAVIOUR CHANGE COMMUNICATION

Aimco House, Akhand Jyoti building, B 2 Flat no 1. 1st floor, Near V.N. Desai Municipal hospital, Santacruz (E), Mumbai- 400055, India.
T: +91 9819868119 E: contact@centreforsbcc.org W: www.centreforsbcc.org
Registered Office: Tilak Mandir, 1st floor, Congress House Compound, V. P. Road, Mumbai 400004.
CIN: U74999MH2017NPL298994

SBC³

निवडलेल्या गावांमध्ये सक्षम दिवस आयोजित करून पुढीलप्रमाणे कार्यक्रम युवक गटामार्फत घेणे अपेक्षित आहे.
१.विद्यार्थ्यांमार्फत गावातून रॅली काढणे.
२.गावात ठिकठिकाणी पथनाट्य सादरीकरण.
३.शाळेत पथनाट्य सादरीकरण.
४.पथनाट्य झाल्यावर मानवी साखळी करून बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेणे.
५.विवाह सेवा पुरवठादार यांची भेट घेणे.
६.गावात अंगणवाडी, शाळा, ग्रामपंचायत व गर्दीच्या ठिकाणी पोस्टर लावणे.
६.मुलांसोबत लिंगभाव समानता आधारित खेळ घेणे.
६.स्वयंसहायता गटातील महिलांसोबत बालविवाह जनजागृती कार्यक्रम घेणे.
७.अंगणवाडी सेविकास यांच्या सहाय्याने किशोरवयीन मुलींचा सक्षम सखी गट तयार करणे.

प्रत्येक गावात एक दिवस कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. यासाठी ज्या दिवशी जास्त नागरिक गावात उपलब्ध असतील असा दिवस निवड करता येईल. युवक गट कार्यक्रमाच्या पूर्वी गावात स्थानिक नेते, मुख्याध्यापक, सरपंच इत्यादी सोबत चर्चा करून नियोजन करतील. तसेच घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे फोटो,व्हिडीओ आणि अहवाल देणे आवश्यक आहे.
सक्षम दिवस राबविण्यासाठी एस.बी.सी.-३ कडून खालीलप्रमाणे सहाय्य केले जाईल.

१.प्रत्येक गावासाठी १०००/- रुपये (युवक गट प्रवास,नास्ता व इतर गोष्टींसाठी सदर खर्च करू शकेल.)
२.टी-शर्ट ( फक्त कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या युवकांना)
३.कार्यक्रमासाठी बॅनर
४.गावात लावण्यासाठी पोस्टर्स
५.पथनाट्य करण्यासाठी स्क्रिप्ट
६.वॉल पेंटिंगसाठी डिझाइन

तसेच सक्षम दिवस कार्यक्रमासाठी एस.बी.सी.-३ समन्वयक हे जिल्हा प्रशासन यांच्याशी समन्वय करतील तसेच आवश्यक ते सहकार्य करतील. आपला जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी आम्ही तुमच्या भागीदारीची आणि समर्थनाची अपेक्षा करतो.

यासाठी आपल्या विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या नांदेड,हिंगोली,लातूर व परभणी या जिल्ह्यातील इच्छुक युवक गटाला निवड करण्यासाठी आणि सक्षम दिवस कार्यक्रम साजरा करण्यासाठी आम्ही आपणास विनंती करतो.

धन्यवाद.

(नंदू जाधव)
प्रकल्प अंमलबजावणी प्रमुख,
बालविवाह निर्मुलन प्रकल्प.

CHANGE.

CENTRE FOR SOCIAL AND BEHAVIOUR CHANGE COMMUNICATION
Aimco House, Akhand Jyoti building, B 2 Flat no 1. 1st floor, Near V.N. Desai Municipal hospital, Santacruz (E), Mumbai- 400055, India.
T: +91 9819868119 E: contact@centreforsbcc.org W: www.centreforsbcc.org
Registered Office: Tilak Mandir, 1st floor, Congress House Compound, V. P. Road, Mumbai 400004.
CIN: U74999MH2017NPL298994